# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>प्रसिद्धी</u>

**पत्रक** **ता. २४ जानेवारी २०१९**

# प्रधानमंत्री आवास योजना एक्सपो चे शुक्रवारी उद्घाटन

## मनपा- क्रेडाईचे आयोजन : नामांकित बिल्डर्सचे स्टॉल्स

**नागपूर,ता. २४** : पंतप्रधान आवास योजनेची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यात यावी, यासाठी खास एक्सपोचे आयोजन नागपूर महानगरपालिका आणि क्रेडाई, नागपूर यांच्या संयुक्त विद्‌यमाने २५ ते २७ जानेवारी यादरम्यान मनपा मुख्यालय परिसर, सिव्हील लाईन्स येथे करण्यात आले आहे. एक्सपोचे उद्‌घाटन शुक्रवार २५ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा, सत्तापक्ष नेता संदीप जोशी, विरोधी पक्षनेता तानाजी वनवे, आयुक्त अभिजीत बांगर, अपर

आयुक्त रवींद्र ठाकरे, बसपा पक्षनेता मोहम्मद जमाल, रा.काँ. पक्षनेता दुनेश्वर पेठे, शिवसेना पक्षनेता किशोर कुमेरिया, धरमपेठ झोन सभापती प्रमोद कौरती, नगरसेविका शिल्पा धोटे, नगरसेवक कमलेश चौधरी, नगरसेविका प्रगती पाटील उपस्थित राहतील.

या एक्स्पोमध्ये सुमारे २५ स्टॉल राहणार आहेत. शहरातील नामांकित बिल्डर्सचेही स्टॉल्स एक्सपोमध्ये राहणार आहेत. सर्वसामान्यांना परवडणारी त्यांच्या बजेटमधली घरे ज्या ठिकाणी उपलब्ध आहे, अशा ठिकाणची माहिती नागरिकांना या एक्सपोद्वारे मिळणार आहे. यासोबतच अर्थसहाय्य करणारी संस्था आणि कर्ज देणाऱ्या बँकांचे प्रतिनिधी एक्स्पोच्या माध्यमातून कर्जाविषयी माहिती देतील. याच एक्स्पोमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेसाठी नागरिकांचे रजिस्ट्रेशन करण्यात येणार आहे. नागरिकांनी या एक्सपोमध्ये भेट देऊन पंतप्रधान आवास योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अपर आयुक्त अझीझ शेख, कार्यकारी अभियंता गिरीश वासनिक, राजेंद्र रहाटे, क्रेडाईचे अध्यक्ष अनिल नायर, सचिव गौरव अगरवाला यांनी केले आहे.